दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी २२ डिसेंबर २०२४

## गरीबी ते ग्रॅमी अनुभवलेला कलाकार

मयूर कुलकर्णी
संगीत समीक्षक, मुंबई

कलासृष्टी मध्ये काम करत असताना काही गोष्टी मनाला इतक्या हळव्या करून जातात त्यातील एक दुःखद घटना म्हणजे उस्ताद झाकीरजीचं जाणं. पंडित रविशंकरजींनंतर भारतीय संगीत पाश्चात्य देशात पोहोचवणारे एकमेवद्वितीय असे कलाकार झाकीरजी होते.

प्रतिभावान कलाकार असताना सुद्धा जमिनीवर पाय ठेवून आपली कला वृद्धिंगत होऊ देणे हे उस्तादजींकडून खूप शिकण्यासारखं होतं. ते शेवटपर्यंत म्हणायचे की, अभी तो हम सिख रहे है. अनेकदा त्यांचा तबला सोलो अगदी जवळून पाहण्याचा योग आला. एक फोटोग्राफर म्हणून त्यांच्या प्रतिमा संग्रहित करता आल्या. जवळजवळ 25-30 कार्यक्रमांमध्ये मी त्यांचे फोटो काढले. प्रत्येक वेळी फोटो काढताना झाकीरजींच्या चेहऱ्यावरची प्रसन्न मुद्रा असायची ती मला फार विलोभित करून टाकायची. त्यांच्याजवळ गेलो, त्यांना नमस्कार केला की अगदी माता सरस्वतीला वंदन करतोय अशी भावना मनात यायची.

आमची पिढी याबाबतीत खूप भाग्यवान असेल की आम्ही झाकीरजींना पाहिलं, ऐकलं, त्यांच्यासोबतच्या अनेक आठवणी आम्ही जमवून ठेवल्या. त्यांचा शेवटचा सोलो १२ ऑगस्टला अब्बाजींच्या गुरुपौर्णिमेमध्ये ऐकला. तो त्यांचा भारतातील शेवटचा कार्यक्रम. उस्तादजी कधीही स्वतःचा तबला स्वतः स्टेजवर घेऊन यायचे. स्टेजवर आल्यावर खचाखच भरलेलं सभागृह एका क्षणात उभं राहायचं.. टाळ्यांचा जल्लोष.. झाकीरभाईंच्या प्रत्येक समेवर मिळालेली दाद.. अशी सम परत होणे नाही. ६ डिसेंबरला त्यांचा ठाण्यात तबला सोलो होणार होता. मी खूप आतुर होतो या कार्यक्रमासाठी. परंतु देवाच्या मनात फार वेगळंच होतं. आज



**स्व. झाकिरजिंसोबत लेखाचे लेखक, संगीत समीक्षक मयूर कुलकर्णी.**

**प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांचे 73 व्या वर्षी निधन झाले आहे.**

त्यांचा जन्म 9 मार्च 1951 रोजी मुंबई येथे झाला होता.

त्यांनी आपल्या वडिलांकडून, उस्ताद अल्लारखां यांच्याकडून, तबल्याचे शिक्षण घेतले आणि लहान वयातच संगीत क्षेत्रात प्राविण्य मिळवले.
त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताला जागतिक स्तरावर पोहोचवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.
त्यांच्या निधनामुळे संगीत क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



आमच्या 'कलाविश्वाचा देव' आमच्यातून निघून गेला असं आज म्हणू शकतो.

उस्तादजींकडून एकेक गोष्ट घेण्यासारखी होती त्यांचं कलेप्रती असलेले प्रेम, बुद्धीचातुर्य, प्रामाणिकपणा, रसिकांबद्दल असलेला आदर इत्यादी गुण वाखाणण्याजोगे
होते. एक कलाकार आणि त्यासोबतच एक माणूस म्हणून झाकीरजी ज्येष्ठ आणि श्रेष्ठ होते. अनेक वर्ष अमेरिकेत राहून सुद्धा त्यांनी नागरिकत्व भारताचे ठेवलं होतं. पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, ग्रॅमी अवॉर्ड असे अनेक नामांकित पुरस्कार त्यांना आजपर्यंत मिळाले. आज त्यांच्या जाण्याने हिंदुस्तानी संगीत खऱ्या अर्थाने पोरकं झालं

या 73 वर्षाच्या आयुष्यात झाकीरजींनी सुरुवातीला गरिबी पण अनुभवली आणि संगीतातला सगळ्यात मोठा पुरस्कार ग्रॅमी पण अनुभवला. खऱ्या अर्थाने उस्ताद जी आपला आयुष्य कलेसाठी जगले आणि कलेप्रती आपलं आयुष्य समर्पित केलं.. 'झाले बहु होतील परी या सम हा'...!

ज्येष्ठ विधिज्ञ **श्रीनिवास घैसास** हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते **जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती** याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.

# मेळेकरीण



## मनाच्या हिंदोळ्यावर



**बाबू घाडीगांवकर,**
**त्रिंबक, ता.मालवण.**
**मो. ९४२१७९५९५५.**

मार्गशीर्ष कृष्ण नवमी. सकाळी डाळपस्वारीचे देव, देवांसोबत चालणारी रयत तळ्यावरच्या आकारी ब्राह्मणदेव मंदिरातून गाव सौंडाळणीसाठी पुढे मार्गस्थ झाली. देवांची वार्षिक डाळपस्वारी ही दक्षिण कोकणात पुर्वापार चालत आलेली, लोकांची अपार श्रद्धा असलेली धार्मिक प्रथा. डाळपस्वारीच्या काळात ग्रामदैवतांच्या शिवकळा गावभेटीसाठी गावात फिरतात. डाळपस्वारी निश्चित करण्यासाठी ग्रामदेवतेचा कौल झाला की मग बारा-पाच वतनदारांनी ठरविलेल्या कार्यक्रमानुसार डाळपस्वारी सुरु होते. एखाद्या गावात तीन ते चार दिवस तर एखाद्या मोठ्या गावात ती आठवडाभरदेखील फिरते. आज एकवीसाव्या शतकात सर्वत्र विज्ञानयुग अवतरले आहे असे आपण मानतो. मात्र दक्षिण कोकणात ग्रामदैवतांच्या वार्षिक डाळपस्वारीबद्दल लोकांच्या मनातली अपार श्रद्धा कायम आहे. देवांचे अवसर, देवांचे तरंग, खांबदुऱ्यांच्या अंगात देवाचा संचार होणे, अवजड खांब खांद्यावरून वाहून नेणे, पायांत चप्पल नाही, अंगात शर्ट नाही, कंबरेला पंचा, गच्च बांधलेला पट्टा, डोक्याला पगडी वगैरे. आपलेच भाऊबंद असलेले, किरकोळ शरीरयष्टीचे हे खांबदुरी देवांचे असे तरंग घेऊन वायुवेगात कसे बरे धावत असतील?

देवांची स्वारी पाणंदीत थांबत, रयतेच्या ओट्या, नवस स्वीकारत पुढे पुढे चालत होती. ढोल, ताशा, वाजंत्र्यांच्या वाद्यवृंदासोबत पुढे पुढे सरकत होती. डाळपस्वारी वरच्या आवाटात चिंचेखाली आली आणि अवचितच वरच्या आवाटातला गंगल्या गडाबडा लोळत, लोटांगण घेत थेट देवांच्या पायांपाशी आला. गंगल्या तसा साधा माणूस. आपले काम बरे नि आपण हे त्याचे तत्व. सहसा कोणाच्या उठण्या-बसण्यात नसलेला गंगल्या आज मात्र विलक्षण हावभाव करीत, वर उठून अंगाचे आळोखे पिळोखे घेत, थरथरत हात जोडून देवांसमोर उभा राहिला. त्याच्या अंगात कोणीतरी देव किंवा अद्भुत शक्ति संचारली होती. त्याला तसा थरथरताना बघताच पावणाई देवीची शिवकळा पुढे झाली. मोठमोठ्याने हातवारे करीत पावणाईची खांबकाठी घेतलेल्या खांबदुऱ्याने गंगल्याची शेंडी गच्च आवळून धरली. " कोणाक नखरे दाखवतंस?... माका? मेळेकारणीक? अरे, मी ह्या गावचा भूत आसंय.... तुझे नखरे माझ्याकडे नको... गावकारा, ऱ्हव रे उभो... बारांक सोबत घे... एक सणसणीत जाप घाल... बाराचो जाप घाल... आज मी ह्येची नाट मोडतंय बघ कशी..." पावणाई देवीला गावऱ्हाटीच्या भाषेत सांगायचे तर, 'मेळेकरीण' म्हणतात. मेळा म्हणजे न्यायनिवाडा. अशा अद्भुत गोष्टींच्या बाबतीत निवाडा करणाऱ्या अशा पावणाईसारख्या ग्रामदैवतांना 'मेळेकरीण' म्हणतात. पावणाईच्या अवसराकडे एक कटाक्ष टाकीत गावकार म्हणाला," आई, लेकरू अंचित हा...लेकरू अडचणीत आसा....माझ्या म्हायतीनुसार लेकरू एका व्यवहारात फसलाहा...आई, लेकरावर कृपादृष्टी कर... लेकराक अडचणीतून भायर काढ." तेवढ्यात गंगल्याचे थरथरणे अकस्मात बंद झाले. गंगल्याच्या शरीरातला देवाचा संचारही शांत झाला. एखाद्या बापड्या माणसासारखा गंगल्या देवांसमोर हात जोडून उभा राहिला. तितक्यात मेळेकरीण जोरात किंचाळत, गावकाराकडे हातवारे करीत ओरडली," गावकारा... बाराचो जाप घाल!"

गावकाराने एक नारळ देवांसमोर ठेवला. नंतर बारा-पाच मानकऱ्यांकडे बघत म्हणाला," बारानु, हडे येवा. हात जोडा... जाप घालतंय... होय म्हाराजा म्हणा... तू आई मेळेकरीण... पाच स्थळा, बारा आकार... सत्तावीस तत्वांची भुमका माझे आई.....ह्या तुझा लेकरू... तुझ्या वेलीचा फळ... गंगाराम माझे आई...लेकरू आज अंचित आसा... लेकरू आज अडचणीत आसा.... लेकरू मर मर मरासर कष्ट करता... पण हाताक यश नाय... लेकराक अडचणीतून भायर काढ...लेकराक गुण दे... लेकराक अनुभव दे... लेकरू तुझ्या पाषाणाकडे बसात... आज आता ह्या भरलेला फळ ठेवलंय. ह्या भरलेल्या फळावर राजी हो... आणि लेकराक अनुभव दे बघू..." गावकारासोबत "होय म्हाराजा!" म्हणत बारा-पाच मानकऱ्यांसह सगळ्या रयतेने आसमंत दणाणून सोडला. गावकाराचे गाऱ्हाणे संपताच मेळेकरीण अधिकच चवताळली. तिच्या खांद्यावरची खांबकाठी अधिकच थरथरू लागली. गावकाराकडे, गंगल्याकडे बघत म्हणाली," गावकारा, लेकरू मूळ मर्यादेक चुकलाहा! लेकराच्या मर्यादेक भ्रष्टाचार चलना नाय रे... पण लेकरान भ्रष्टाचार केल्यान. तेचीच फळा आता लेकरू भोगताहा!" गावळ्ऱ्हाटीच्या भाषेतला असा भ्रष्टाचार म्हणजे पैशांची अफरातफर किंवा गफला नाही. आपल्या घराण्यास जे चालत नाही, जे बाधाकारक आहे, अशुद्ध वर्तन किंवा पापकर्म मानले गेले आहे, असे वर्तन आपल्या हातून घडणे म्हणजे भ्रष्टाचार.

एकदा गावकाराकडे बघत, परत गंगल्याकडे लालबुंद डोळ्यांनी नजर रोखून बघत मेळेकरीण म्हणाली," लेकराच्या घराण्यात नशापाणी चलना नाय.... लेकराच्या घरात देवीचा तत्व आसा... लेकराच्या अंगात देवीचा पाणी आसा...

**(पान ८ वर )**

## भाग ३- रानातले घर

## गावाकडच्या आठवणी



**भावेश लोंढे,**
**दापोली**
**मोबा. ९७६९३८६०९१**

एकदा दुपारच्या वेळी मी आमच्या अंगणात खेळत होतो.समोर माडाच्या झापातून येणाऱ्या सूर्य किरणांकडे टक लावून पाहत होतो.तितक्यात वासू आजोबा आले नी म्हणाले,

"येतोस का सड्यावर"

"आता?"

"हो आता, रानात घर हाय तिथं"

"रानातलं घर"

मी मागचा पुढचा विचार केला नाही आणि "येतो येतो" करीत पडवीत पडलेल्या चपला पायात घातल्या. त्यांच्या बरोबर निघालो. रानात घर कसे असते हे बघायची मला ओढ लागली होती. रानात घर असते तेव्हा मला माहित झाले. रात्रीच्या वेळी जंगली जनावरांपासून शेतीचे रक्षण करण्याकरिता लोकं शेतात लाकडी खोपटी बांधून रहात होते हे माहीत होते. पण रानात लोकं राहतात. त्यांचे आपल्या सारखे घर आहे, हे तेव्हा माहीत पडले. मी वासू आजोबांच्या मागून सोनेरी गवत पहुडलेल्या वाटेवरून चालू लागलो होतो. तांबड्या नागमोडी वाटेवर अधेमधे काळ्या, जांभ्या दगडांनी डोकेवर काढले होते. ठेच लागू नये म्हणून ते चुकवत मी त्यांच्या मागून चालत होतो. आजोबांनी कंबरेत आकडी बांधली होती. आकडीत कोयती लावली होती. त्याचा चालताना पावलामागे खणखण येणारा आवाज रानातील शांततेचा रसभंग करीत होता.दुपारच्या ऊन्हात सर्व रान पाखरे चिडीचूप झाली होती.सोबत डोक्यावर सिमेंटच्या पिशवीत कसलासा बोचका घेतला होता.माझ्या हातात पाण्याची पिशवी दिली होती.ती मी खांद्याला लावली होती. देवळाची डाग चढून गेल्यावर आजोबांनी डोक्यावर असलेला बोचका बांधावर ठेवला आणि म्हणाले, हा वाटेतला आंबा. येनाजानारा पहिला दम येथे खातो.याच बांधावर गोयली,लाकडे उतरवली जातात.पाण्याच्या घोट घेतला जातो नी पुन्हा माणूस पुढच्या वाटेला लागतो. हा आंबा हाय म्हणून तर वाटसरूला,गुराखीला आधार वाटतो. भाकर तुकडा याच सावलीत तो बसून खातो."



"हे मी ऐकून मान डोलावली तितक्यात भसकन वाटेवरून साप सळसळत पातेऱ्यातून गेला.मी घाबरलो थोडा.पटकन उभा होऊन सावध झालो.

"काय नाय काय नाय"आजोबा बोलले.

काही कळायच्या आत साप करवंदीच्या जाळीत दिसेनासा झाला.

"हा इथला राखणदार हाय. या रानाचा तो कर्ता करविता पुरुष."

"पुरुष?"

"तुला नाही कळणार तू लहान आहेस."

पुढे मी काहीच बोललो नाही.गप्प चालायला लागलो.आजोबाच बोलत राहिले आणि मी ह ह हुंकार करीत त्यांच्या मागून पावले उचलीत राहिलो.सापाची मनात भीती भरली होती.कुणाकडून मी ऐकले होते की,आपली सावली सापावर पडली की पाठीमागून येतात.हे खरं तर होणार नाही ना म्हणून मी सारखा पाठीमागे वळून पाहत होतो.

पुढे गेल्यावर ह्याला 'दंड'म्हणतात.

"ही जमीन बामनांची.पुढे कोंडवी आहे.पाचकुडी पण लागते.आम्ही हिकडेच गुरां घेऊन यायचो. गवताची वरंड बांधून खाली शेतावर न्यायची.आमचा रानात ऊन्हात,पावसात अर्धा आयुष्य गेला." आजोबांचे बोलणे सुरूच होते. जवळजवळ पाऊण तास झाला तरी चालतच होतो.मी विचारले,

"अजून किती लांब हाय?"

तसे हात दाखवत म्हणाले,

"हे काय आलंच"

निमुळती पुढे जाणारी फक्त वाट, झाडे, गवत आणि जमिनीला टेकलेले आभाळ दिसत होते.

अजून अर्धा तास चाललो,तेव्हा कुठे रानातल्या घराची चाहूल लागली. ताडतुडे, बिबव्याची बोंडे खात मजलदरमजल करीत धाप टाकत मोठ्या हिमतीने तिथे पोहचलो होतो.

गच्च,गर्द रानात ते एकमेव घर पाहून हबकून गेलो होतो.आपल्या घरासारखेच कौलारू घर होते. ओठी,पडवी,अंगण,परसदार होते.पुढे सारवलेल्या अंगणात मांडव घातले होते. बाजूने सलदी बांधली

**(पान ८ वर )**

# कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी-
भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.



## भाग - १
## जमिनीच्या अनुषंगाने असणारे कायदे

**ज्येष्ठ विधिज्ञ श्रीनिवास घैसास हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.**

जमिनीची सर्व माहिती मिळवत असलम अधिनीच्या अनुषंगाने सामू कोणाच्यामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनिकारण १९६६ याची माहिती आपल्याला करून घेणे आवश्यक आहे कारण या कायदांत जमिनीच्या अनुषंगाने असणारी सर्व कागदपत्रे तयार केली जातात व जमिनीच्या सर्व हक्कनोंद फेरफार अदद्ययावत केले जातात. त्यामुळे आपण जमिनीच्या सयौ तर माहिती या पुस्तकात करून घेणार आहोतच. या कायदधाव्यतिरिक्त जमिनीच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे कायदे आज अस्तित्वात आहेत. त्या सर्व कायद्यांच्या तरतुदीनुसारच जमिनीचा मालकी अस्तित्वमश्चित केला जातो. म्हणूनच त्या कायट्यांचीदेखील माहिती करून इसके आवश्यक आहे. आता जमिनीच्या अनुषंगाने उच्द्या लागू होणारे कायदे पुढीलप्रमाणे :-

१) मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९४८,
२) जमीन तुकडेबंदी आणि एकत्रीकरण अधिनियम, १९४७,
३) मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८,
४) महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५
या व्यतिरिक्तदेखील अनेक कायदे जमिनीच्या हक्काशी निगडित आहेत. उदाहरणच देऊन बोलायचे झाले, तर जमिनीच्या मालकाच्या धर्मावरून त्याला लागू होणारे व्यक्तिगत कायदे हे सुद्धा आपणाला. पाहावे लागतील. समजा, एखादया जमिनीचा मालक हिंदू असेल आणि तो मरण पावला, तर त्याच्या जमिनीचे वाटप हे त्याला लागू होणाऱ्या हिंदू वारसा हक्काप्रमाणे होईल. समजा, एखाद्या जमिनीचा मालक मुस्लिम असेल आणि तो मरण पावला, तर त्याच्या जमिनीचे वाटप हे त्याला लागू होणाऱ्या व्यक्तिगत कायद्याप्रमाणे म्हणजेच 'शरीरियत' प्रमाणे होईल.

यांप्रमाणेच कित्येक वेळा एखाद्या कायदेशीर वारसाने त्याचा मालकी हक्क विशिष्ट मुदतीत सादर केला नाही, तर तो त्याला शाबित करून घेता येत नाही. म्हणजेच याचा अर्थ या ठिकाणी लिमिटेशन अॅक्टदेखील लागू होतो. अशा प्रकारे ही साखळी कितीही वाढवता येईल आणि त्या सर्व कायदयांचा येथे परामर्श घेण्याचे ठरवलेत, तर या पुस्तकाचे खंडावर खंड प्रसिद्ध करावे लागतील, म्हणूनच आपण जमिनीशी अगदी चेट असणाऱ्या व कायदयांचाच परामर्श या ठिकाणी घेणार आहोत.

जमिनीशी निगडित असलेला आणखी एक महत्त्वाचा कायदा म्हणजे ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी अॅक्ट, १८८२ हा होय. खरे, तर याचीदेखील सविस्तर माहिती घेणे आवश्यक आहे. परंतु एकूण पुस्तकाची पानमर्यादा लक्षात घेता कोणत्या कागदपत्राने जमिनीचे हस्तांतरण होऊ शकते अशा कागदपत्रांपैकी महत्त्वाच्या कागदपत्रांची माहिती आपण या ठिकाणी करून घेणार आहोत.





# वास्तुशास्त्रानुसार पाण्याचा झरा

वास्तुशास्त्रानुसार पाण्याचा झरा किंवा फव्वारा घरात ठेवणे समृद्धी, शांतता, आणि सकारात्मक ऊर्जा आणण्यासाठी फायदेशीर मानले जाते. खाली सामान्य वास्तुशास्त्र टिप्स दिल्या आहेत:

1. स्थान (Direction)
- ईशान्य दिशा (North-East): ही दिशा पाण्यासाठी सर्वोत्तम मानली जाते. फव्वारा येथे ठेवणे समृद्धी आणि शांती वाढवते.
- उत्तर दिशा (North): ही दिशा आर्थिक प्रगतीसाठी उत्तम आहे.
- पूर्व दिशा (East): आरोग्य आणि सकारात्मकता वाढवण्यासाठी योग्य.

2. पाण्याचा प्रवाह (Water Flow)
- फव्वाऱ्यातील पाण्याचा प्रवाह घराच्या आतल्या दिशेने असावा. यामुळे समृद्धी आणि संपत्ती घराकडे येते.
- पाणी नेहमी स्वच्छ आणि वाहते असावे; स्थिर किंवा दूषित पाणी नकारात्मक ऊर्जा निर्माण करते.

3. फव्वाऱ्याचा प्रकार (Type of Fountain)
सर्वात चांगले: नाजूक, आवाजात सौम्य असलेले फव्वारे



- सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात.
- आकार: गोल, अर्धगोल किंवा लहान डिझाईन्स चांगले मानले जातात.
- साहित्य: नैसर्गिक दगड किंवा मृदू रंगांच्या फव्वाऱ्यांना प्राधान्य द्या.
- **4. देखभाल (Maintenance)**
- फव्वाऱ्यातील पाणी नेहमी स्वच्छ आणि ताजे ठेवा.
- गाळ, कचरा किंवा शैवाल (algae) जमा होऊ देऊ नका.
- फव्वाऱ्याची दुरुस्ती वेळेवर करा; फुटलेल्या किंवा खराब अवस्थेतील फव्वारे नकारात्मक परिणाम करू शकतात.

**काय टाळावे (Avoid These)**
- फव्वारा दक्षिण दिशेला किंवा आग्नेय दिशेला ठेवू नका; ही दिशा अग्नीची आहे.
- फव्वारा बेडरूम किंवा स्वयंपाकघरात ठेवणे टाळा.
- पाण्याचा झरा कोरडा ठेवणे किंवा फव्वारा निष्क्रिय ठेवणे अशुभ मानले जाते.

# ग्रहांकित रोग व आजार भाग-५

अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

(मागील भागावरून पुढे..)

**मागील भागात आपण गुरु आणि त्याच्याशी संबंधित आजार यांबाबत अल्पांशाने माहिती घेतली. पुढे आपण शुक्र (भार्गव) या ग्रहासंदर्भात माहिती घेवुयात.**

शुक्र हा सूर्यमालेतील सूर्य आणि पृथ्वी यांच्यामध्ये बुधानंतर कक्षेत भ्रमण करणारा ग्रह आहे. सूर्य आणि चंद्र वगळता सूर्यमालेतील हा सर्वाधिक चमकदार ग्रह असून साधारणतः तो सायंकाळी आणि प्रातःकाळी दिसतो म्हणून त्याला ' सायंतारा ' व ' पहाटतारा ' असे म्हणतात. शुक्र हा महर्षी भृगूंचा पुत्र आहे असा उल्लेख वेद आणि पुराणात आहे. बृहस्पती जसे देवांचे गुरु मानले जातात तसेच शुक्र हे दैत्यांचे गुरु मानले जातात. दैत्यगुरु शुक्राचार्य असेही त्यांना संबोधले जाते.

वैज्ञानिकदृष्ट्या शुक्रग्रहाचे तापमान अधिक असल्याने तेथे सजीव व वनस्पती यांचे अस्तित्व नसल्याचे अनुमान आहे. शुक्र हा ग्रह पृथ्वीपासून सुमारे ३,४३,००,००० मैल अंतरावर व सूर्यापासून सुमारे ६,७०,००,००० मैल इतक्या अंतरावर आहे. स्वतःच्या अक्षाभोवती शुक्र ग्रह साधारणता २३ ते २४ तासात एक प्रदक्षिणा करतो व सूर्याभोवती साधारणत: आठ महिन्यात एक प्रदक्षिणा करतो. शुक्र जेव्हा पृथ्वीच्या अगदी जवळ येतो तेव्हा त्याचे पृथ्वीपासूनचे अंतर अगदी कमी म्हणजे सुमारे २०,००,००० मैल इतके असते. यावेळी तो पृथ्वीवरून अतिशय प्रकाशमान आणि तेजस्वी दिसतोमैल इतके आहे तर सूर्यापासूनचे अंतर सुमारे ४८,३२,००० मैल इतके आहे. सूर्याभोवती एक प्रदक्षिणा करण्यास गुरूला बारा वर्षे लागतात. अर्थात सूर्याचे एका राशीत सुमारे एक वर्षभर भ्रमण असते. सूर्याच्या पृष्ठभागाचे तापमान सुमारे १३८० अंश सेंटीग्रेड असल्याचा उल्लेख आहे. गुरुवर सोडलेल्या ' व्हायकिंग ' या यानाने पाठवलेल्या छायाचित्रांनुसार गुरुवर पाणी, वारा यांच्या अस्तित्वाचे चिन्ह आढळले नाही. गुरुवर दाट वायूचे ढग असावेत किंवा ग्रुरू हा वायूचे बुडबुडे असणारा एक लाव्हा उफाळवणारा गोळा असावा असे वैज्ञानिकांचे मत आहे.

ज्योतिष शास्त्रात गुरूला सात्विकता, शारीरिक सुदृढता आणि ज्ञान यांचा कारक मानले गेले आहे. गुरु हा धर्म, न्याय, पारलौकिक सुख यांचा कारक आणि

ज्योतिष शास्त्रात शुक्राला कामवासनेचा प्रतीक मानले आहे. पुरुषाच्या जन्म कुंडलीत शुक्रावरून पत्नीसुख, सौंदर्य, कामेच्छा, वाहनयोग, वास्तुसौख्य, संगीत, काव्य, गायन, वाद्य वादन.. इत्यादी गोष्टींचा विचार केला जातो. वृषभ आणि तुळ या राशींचा शुक्र स्वामी आहे तसेच भरणी, पूर्वाफाल्गुनी आणि पूर्वाषाढा या तीन नक्षत्रांवर त्याचे आधिपत्य आहे. तुळ राशीत हा विशेष बलवान असतो. अंकशास्त्राप्रमाणे ६ या अंकाचा शुक्र हा प्रतिनिधी आहे. शुक्राला '-काळ पुरुषाचा काम ' असे म्हटले गेले आहे. सांसारिक सुखप्राप्तीसाठी शुक्र प्रबळ आणि अनुकूल असणे आवश्यक आहे.




विवाह मुहूर्ताचे वेळी शुक्र शुभ असणे आवश्यक असते कारण विवाहानंतर प्रापंचिक, दांपत्यसुख शुक्र देत असतो. गुरु व शुक्र अस्तंगत असता, वक्रि असता विवाह संपन्न केले जात नाहीत.

जन्म कुंडलीत शुक्र बलवान असेल, शुभ स्थानी असेल तर व्यक्ती अभिनेता, लेखक, कादंबरीकार, कवी, सुंदर, आकर्षक, चित्रकार, कलाकार, सुगंधी वस्तूंचा व्यापारी, नर्तक, हॉटेल व्यावसायिक, हलवाई, ज्योतिषी, तांत्रिक तसेच सुगंधी द्रव्यांचा व्यवसाय करणारा असतो. व्यक्तीचे राहणीमान उच्च दर्जाचे शृंगारिक असते. शुक्र शरीरसुख आणि भोगविलासाचा कारक आहे. त्याचप्रमाणे तो नशेचाही कारक आहे. शुक्रामुळे मदिरापानाचे व्यसन जडते, वाढते. शुक्र आकर्षणातून प्रेमाचाही कारक आहे. शुभ शुक्र मानसन्मान, पारितोषिके, गौरव यांचाही कारक आहे.

जन्म कुंडलीतील दुर्बल किंवा अशुभ योगातील शुक्र तसेच अस्तंगत असलेला शुक्र, वक्री शुक्र हा अनिष्ट परिणामकारक फले देतो. प्रमेय रोग, त्वचारोग, मूत्राशयासंबंधित आजार, मैथुन रोग, कफ, वीर्याची कमतरता, नपुसकत्व, मूत्रपिंडाचे विकार, संभोगातून उद्भवणारे गुप्तरोग, धनुर्वात, दातदुखी, मधुमेह, घोळणा फुटणे, प्रदररोग, हिस्टेरिया, स्वप्नदोष, निद्रानाश, श्वसनाचे विकार हे शुक्राच्या अशुभ फलाचे परिणाम असतात.

एकूण आध्यात्मिक आणि अधिभौतिक तसेच मानसिक सौख्याचा कारक शुक्र असल्याने शुक्रबळ कमी झाल्यास व्यक्तीला नैराश्य ग्रासते. संतती प्राप्तीसाठी शुक्राणूंचे बळ असणे आवश्यक असते. यासाठी शुक्रबल महत्त्वाचे. पुत्रसंततीसाठीही गुरु आणि शुक्र यांचे बलवान असणे आवश्यक असते. पांढऱ्या धुपणीच्या आजारात शुक्राची उपासना परिणामकारक ठरते. या आजारात अतिशय अशक्तपणा येवुन जीवाला घातक परिणाम संभवत असतात. यासाठी ग्रहांकित उपायांबरोबरच वैद्यकीय सल्ला व उपाय विनाविलंब व नियमित करणे अत्यावश्यक असते. दुर्लक्ष करणे प्रकृतीचा ऱ्हास करण्यावर आणि प्रसंगी जीवावर बेतू शकते. लघवीतून साखर जाणे हे देखील शुक्राच्या अशुभत्वामुळे घडू शकते. मधुमेहामुळे बहुतांशी व्यक्ती अनेक रोग, आजार आणि व्याधींना बळी पडतात. अशावेळी वैद्यकीय उपचारांसोबत जन्मपत्रिकेनुसार तज्ञ ज्योतिष्यांचेही मार्गदर्शन उपायासाठी घ्यावे

# शाळांची बदलती स्नेहसंमेलने

मोक्षदा घाणेकर

सध्या शाळा आणि महाविद्यालयांची वार्षिक स्नेहसंमेलन सर्वत्र सुरु आहेत. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी मुलांचे नृत्य, नाटिका, एकपात्री प्रयोग यांसारखे कार्यक्रम यानिमित्ताने भरवले जातात. शिशुवर्गापासूनच्या मुलांना नृत्याच्या कार्यक्रमात सहभागी करून घेतले जाते. प्रत्यक्ष कार्यक्रमाआधी महिनाभरापासून मुलांकडून कसून सराव करून घेतला जातो. बड्या खासगी शाळांकडून स्नेहसंमेलनासाठी वातानुकूलित शाही सभागृह आरक्षित केले जाते. संमेलनाला समस्त पालकांना निमंत्रित केले जाते. मुलांच्या वेशभूषेपासून सभागृहाच्या आरक्षणाचा आणि पाहुण्यांच्या चहा-पाण्याचा खर्चही बहुतेक ठिकाणी विद्यार्थ्यांच्या पालकांकड्न वसूल केला जातो. मुलांच्या शाळाप्रवेशासाठी लाखोंचे डोनेशन देणाऱ्या पालकांचीही याला हरकत नसते. आपली मुले पहिल्यांदा व्यासपीठावर नृत्य करणार या कल्पनेनेच गदगद झालेले पालक आपल्या पाल्याचा नृत्याविष्कार पाहण्यासाठी नोकरी व्यवसायातून सुट्टी घेऊन जातीने उपस्थित राहतात. प्रत्यक्षात कार्यक्रम पाहताना एकसारखी वेशभूषा केलेल्या २५-३० मुलांच्या गराड्यात आपले बाळ ओळखताना पालकांचाही वेळ जातो. बाळाला केंद्रित करून बाळाचे नृत्य आपल्या वे ! मोबाईलमध्ये ध्वनिचित्रित करताना बिचाऱ्या पालकांनाही चांगलीच कसरत करावी लागते. हल्ली टीव्ही चॅनल्सवर चालणाऱ्या लहान मुलांच्या नृत्याच्या रिऍलिटी शोजचा परिणाम या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमांवरसुद्धा सध्या पडू लागला आहे. आपल्याकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात बालगीते आणि बडबड गीतांचे भांडार असताना काही शाळांत दुसरी तिसरीच्या कोवळ्या मुलांना हिंदी चित्रपटातील रोमँटिक अथवा आयटम साँग्सवर नाचवले जाते. ज्या गाण्यातील शब्दांचा अर्थही मुलांना माहीत नसतो अशा गाण्यांवर मादक हालचाली आणि हातवारे करणाऱ्या या कोवळ्या मुलांच्या नृत्यावर हसावे कि रडावे हेही नेमके कळत नाही. विशेष म्हणजे उपस्थित पालकही अशा नृत्यांच्या सादरीकरणावर बेहद खुश होऊन शिट्या आणि टाळ्यांची बरसात करतात. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून आयोजित करण्यात येणाऱ्या या स्नेहसंमेलनातून मुलांवर कुसंस्कार तर होत नाहीत ना याचे भान शाळा व्यवस्थापनाने राखायला ह

**मिनरल वॉटर प्लान्ट अ◌ॅण्ड ड्रिंकींग वॉटर प्लान्ट सप्लायर्स**

**१) डी. एम. प्लान्ट: अ◌ॅक्वाप्यूरो इक्वीपमेन्टस प्रा. लि.**

**पत्ता : ४१६/४१७ जोगनी इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, बिल्डींग नं. ९,**

**व्ही. एन-पुरव रोड, चुनाभट्टी, मुंबई-४०००२२.**

**फोन : ०२२-२४०५२८१४/१५/१३/१६.**

**वेबसाईट : www.aquapurosystm.com**

**(मिनरल वॉटर आणि डी. एम. प्लान्ट यांचे सप्लायर्स आणि उत्पादक, पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर प्लान्ट, कंपलीट वॉटर ट्रिटमेंट प्लान्ट यांचे उत्पादक आणि सप्लायर्स)**

# सरकारी योजना/नोकरी

## ‘आंबिया बहार फळ पीक विमा योजना’

**पुनर्रचित हवामान आधारित ‘फळ पीक विमा योजना’ आंबिया बहार सन 2024-25 मध्ये डाळिंब, संत्रा, मोसंबी, काजू, केळी, द्राक्ष, आंबा, पपई व स्ट्रॉबेरी या 9 फळपिकांसाठी 30 जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, यासाठी या योजनेची माहिती देणारा हा लेख...**

बिया बहार  फळ पीक विमा योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांचा अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी  सहभाग ऐच्छिक आहे. योजनेत सहभागी होणेबाबत अथवा न होणेबाबत घोषणापत्र ज्या बँकेमध्ये पिककर्ज खाते/ किसान क्रेडिट कार्ड खाते आहे तिथे जमा करणे आवश्यक आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी न होण्याबाबत घोषणापत्र योजनेत सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या 7 दिवस अगोदर बँकेला देणे आवश्यक आहे. जेणेकरुन बँक विमा हप्ता परस्पर कपात करणार नाही. तसेच कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज घेतलेल्या अधिसूचित फळपिकांकरिता विहित नमुन्यातील घोषणापत्र संबंधित बँकेत सादर करणे आवश्यक राहिल. जे कर्जदार शेतकरी विहित मुदतीत सहभागी न होण्यासाठी बँकांना कळविणार नाहीत, असे शेतकरी योजनेत सहभागी आहेत असे गृहित धरण्यात येईल व या शेतकऱ्यांचा विमा हप्ता विहित पद्धतीने कर्ज खात्यातून वजा करण्यात येईल.

अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित फळपिके घेणारे या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांस  नोंदणीकृत  भाडेकरार अनिवार्य आहे. या योजनेत राज्यात प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरीता एका फळपीकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र 10 गुंठे (0.10 हे) आणि उर्वरित विभागाकरीता कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र 20 गुंठे (0.20 हे.) अशी मर्यादा राहील. एका शेतकऱ्यास अधिसूचित फळपिकासाठी मृग व आंबिया बहार मिळूण जास्तीत जास्त 4 हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत विमा नोंदणी करण्याची मुभा आहे. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षणाचे कवच लागू राहणार आहे. त्यासाठी फळपिकांचे उत्पादनक्षम वय पुढीलप्रमाणे राहील. आंबा, चिकू, काजू फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय 5 वर्षे, लिंबू फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय 4 वर्षे, संत्रा, मोसंबी, पेरू, सीताफळ फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय 3 वर्षे, डाळिंब, द्राक्ष फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय 2 वर्षे, केळी, पपई, स्ट्रॉबेरी पिकासाठी उत्पादनक्षम वय नाही. त्यापेक्षा कमी वयाच्या फळबागा लागवडीस विमा संरक्षणाची नोंद झाल्याचे पडताळणीत निदर्शनास आल्यास विमा संरक्षण संपुष्टात येईल.

ही योजना पुढीलप्रमाणे कंपन्यांच्या माध्यमातून अधिसूचित जिल्ह्यात राबविण्यात येते. जळगाव, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, वर्धा आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनी लि.,  जालना जिल्ह्यासाठी फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनी लि.,  छत्रपती संभाजीनगर, धाराशिव ,अमरावती,अकोला, नागपूर, परभणी, रायगड, नंदुरबार जिल्ह्यासाठी युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. आणि ठाणे, पालघर, धुळे, पुणे, सांगली, लातूर, बुलढाणा, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा, बीड, आणि वाशिम जिल्ह्यासाठी बजाज अलियांन्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या कंपन्यांच्या माध्यमातून अधिसूचित जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

आंबिया बहार सन 2024-25 मध्ये फळपिक द्राक्ष पिकासाठी विमा संरक्षित रक्कम 3 लाख 80 हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 1 लाख 27 हजार असून शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक 15 ऑक्टोबर, 2024 असा आहे

मोसंबी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 33 हजार आहे. केळी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख 70 हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 57 हजार आहे. पपई पिकासाठी विमा संरक्षित रक्कम 40 हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 13 हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक 31 ऑक्टोबर 2024 असा आहे

संत्रा पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 33 हजार आहे. काजू पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख 20 हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 40 हजार आहे. आंबा (कोकण) पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख 70 हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 57 हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक 30 नोव्हेंबर 2024 असा आहे.

आंबा (इतर जिल्हे) पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख 70 हजार आहे.गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 57 हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक 31 डिसेंबर 2024 असा आहे.

स्ट्रॉबेरी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम दोन लाख 40 हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 80 हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक 14 ऑक्टोबर 2024 असा आहे.डाळिंब पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख 60 हजार आहे.गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम 53 हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक 14 जानेवारी 2025 असा आहे.योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता सर्वसाधारण पणे विमा संरक्षित रकमेच्या 5% असतो. मात्र काही जिल्ह्यात तो जास्त असू शकतो .

आंबिया बहार सन 2024-25 या वर्षासाठी अधिसूचित फळ पिके, समाविष्ट हवामान धोके व कालावधी निश्चित करण्यात आला आहे. अवेळी पाऊस, कमी /जास्त तापमान, वेगाचे वारे, गारपीट इत्यादी  निर्धारीत केलेले हवामान धोके (Weather Triggers)लागू झाल्यास विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई विमा कंपनी मार्फत देय होणार आहे.

योजनेत सहभाग करीता राष्ट्रीय पिक विमा पोर्टल (https://pmfby.gov.in) या संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच आंबिया बहारात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांसाठी गारपीट (Add on Cover) या हवामान धोक्यासाठी राज्य शासनामार्फत विमा संरक्षण उपलब्ध करुन देण्यात आलेले असुन गारपीट या हवामान धोक्यासाठी सहभाग ऐच्छिक राहील व याकरीता अतिरिक्त विमा हप्ता देय आहे. ज्या शेतकऱ्यांना गारपीट या हवामान धोक्याकरिता सहभाग नोंदवावयाचा असेल अशा शेतकऱ्यांनी त्यांचा नियमीत व  अतिरिक्त विमा हप्ता हा बँकांमार्फतच भरणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी अधिसुचित फळपिकांच्या हवामान धोक्यांची तसेच त्यांना भरावयाच्या विमा हप्त्याची माहिती करुन घेऊन विहित मुदतीमध्ये नजिकच्या ई-सेवा केंद्र किंवा बँक / वित्तीय संस्था यांच्याशी संपर्क साधून सहभाग नोंदवावा. आंबिया बहारातील अधिसुचित योजनेच्या अधिक माहितीसाठी सबंधित विमा कंपनीचे तालुका कार्यालय किंवा कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.




**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍंड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट  फोन  ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

**आठवणींच्या गोष्टी**

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# लोकगीतकार कवी रमेश बैले

एकोणीसशे नव्वद साल असावं मी माझा मित्र संगीतकार डी महेंद्रकुमार यांच्या विक्रोळी येथील घरी बसलो होतो. त्यांन मला एक गीत ऐकविले,

**"पिताव मंग झिंगताव कशाला**
**झिंगताव मंग् पिताव कशाला**
**दारूची वाईट नशा**
**तुमच्या जीवाची करील दशा"**

प्रख्यात गायक आनंद शिंदे यांच्यासाठी हे गीत ते संगीतबद्ध करत होते, त्या गिताला ते चाल लावत होते, आणि मी ऐकत होतो.राष्ट्रपाल हे गीत कवी रमेश बैले यांचं आहे.
मी महेंद्र यांना म्हटल

**"चल गड्या उठ की र**
**बंबई को जाना**
**पोटाला पोटभर मिळ गा खाना**
**थोडस बांधून पाटकुळी लेना"**

हे गाणं पणं त्याचं आहे ना? महेन्द्र होय म्हणाले .
ज्यांची अनेक लोकगीत आनंद शिंदे, मिलिंद शिंदे यांच्यासह अनेक नामवतांनी नवोदित यांनी गायली आहेत. ज्यांना अनेक नामवतांचा सहवास मार्गदर्शन मिळाले, ज्यांच्या गीतांच्या शेकडो कॅसेट सी डी व्हीसीडी आल्या गाजल्या त्या ज्येष्ठ कवी गीतकार रमेश बैलेनी नागपूर मधून दर रविवारी गेली वर्षभर दैनिक बहुजन सौरभ मधून मी लिहीलेली लेख माला वाचून मला फोन केला. सर मी नियमितपणे तुमची लेखमाला वाचतो आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जुन्या नव्या नामांकित कलावंताची माहिती लिहून जे कार्य करत आहात त्याबद्दल तुमचं मी रमेश बैले अभिनंदन करत आहे. नावं ऐकून दादासाहेब धन्यवाद म्हटल. अनेकांशी संपर्क करतोय व्वा योग चांगला आहे म्हणालो आणि मग आमच्या गप्पा रंगल्या.

**"लय जगणं होत भीतीचं**
**अंगी बळ नव्हतं हत्तीच**
**अशी हो बघा घटना**
**आमच्या घडली नव्हती जातीत**
**भिमान बघा सोनं कसं**
**पिकवल मातीत.."**
**"नको लढाई पुतळ्याची**
**नाय झूकणार कुणापुढ मान आमची**
**कोणी मोजू नका उंची र**
**माझ्या भीमाच्या ज्ञानाची "**
**अशी भीम गीत**
**"नटून थटून शी नवरी सजवूनशी**
**लाजत मुरडत जाशील गो**
**मुसमुस करतेस कला ग मालू**
**उद्या मिठू मिठू पोपट बोलशील ग "**

शकुंतला जाधव यांनी गायलेले लग्न गीत, पाळणा
गीते, कोळी गीते भीम गीते, राष्ट्र पुरुषांची गीते, देशभक्ती गीते ते गौरी गणपती सर्व जाती धर्माची गीते लिहिणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व कवी रमेश बैलै यांच्या विषयी थोडक्यात.

मूळगावं मुक्काम पोस्ट वडूज, ता. खटाव, जिल्हा सातारा जन्म दहा जून १९५४.आईचं नावं तानुबाई, वडिलांचं नावं सुदाम दगडू बैले. चार भाऊ मोठा सुरेश सर्वात लहान आनंद, रमेश यांच्या नंतर नागसेन आणि पाच बहिणी शारदा, मीना, शोभा, वंदना, विजया. कविवर्य रमेशजीना माधुरी,राजू , रोहन , राहुल ही चारमुले व चार नातवंडे जय,जीत, अर्नव , जानवी हे आहेत. आपल्या कला कार्यात आई वडील, भावंड, पत्नी संध्या आणि मुलांची उत्तम साथ मिळाली हे त्यांनीं आवर्जून सांगीतले. सध्या ते मुंबईत बांद्रा पूर्व येथे राहतात. पत्नीच्या नावे युट्यूबवर संध्या म्युझिक नावाने गीते शेयर करतात.१९८५ते २००५पाच जवळपास वीस वर्षे ही उभयतां विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून पद भूषविले आहे. कवी गीतकार बैलेदादाच्या निवडक गीतांचे दोन संग्रह बृहानपुरवाला यांनी प्रसिद्ध केलेत. एच. एम व्हीं, व्हिनस, टी सिरीज टिप्स यांनी गीतांच्या कॅसेट, सी डी, व्ही. सी, डी काढल्या आहेत. ते पद्य लेखन करतातच पणं गद्य लेखनात कुठं कमी नाहीत. वयाच्या पंधराव्या वर्षापासून लोकनाट्य लिहून, तमाशात अभिनय केला आहे. गुताड, वर्गणी, बाप्पा तुझी कृपा आहे या चित्रपटांच्या कथा लिहिल्या आहेत. नवीन कलावंत तरुणांना प्रेरणा


डी महेंद्रकुमार

मिळावी यासाठी "महाराष्ट्राचा महा कंठ"नावाचा कार्यक्रम आयोजित करण्याची त्यांची संकल्पना आहे. कविवर्य म्हणाले सर मी भाग्यवान आहे कारण साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, शाहिर आत्माराम पाटील, शाहिर साबळे, शाहिर अमर शेख, निवृत्ती पवार, बालकराम पवार, विठ्ठल उमप, नवनीत खरे, प्रल्हाद शिंदे, विठ्ठल शिंदे गोविंद म्हशिलकर भिकू भंडारे, शाहीर पांडुरंग वनमाळी, तुकाराम धडाम, विठ्ठल हेदुकर वग सम्राट दादू इंदुलकर, कवी दामोदर शिरवाळे, सर्व शिंदेशाही परिवार यांचा सहवास, प्रोत्साहन मार्गदर्शन मिळाले त्यांच्या प्रती मी आदरभाव व्यक्त करतो. जयवंत कुलकर्णी, पुष्पा पागधरेसह शकुंतला जाधव ते इतर गायक गायिका यांनी माझी गीते गायली त्या सर्वांना धन्यवाद देतो. मला दादा कोंडके यांची समक्ष भेट घेता आली नाही याविषयी खंत वाटते म्हणाले. मला नवीन नवीन विषयावर गीत लेखन करण्यास आवडते. मी लोक गीत लिहितो, ती अश्लील नसतात. समाजांतील वास्तव गीतात लिहितो. एकेकाळी दादा कोंडके यांची गाणी सर्वसामान्य लोकांना आवडली आताही ती आवडतात,डबल मिनिंग गाण्याचा माझ्यावर प्रभाव पडला. लोकांना जे हव ते त्यांच्या मनोरंजन आणि त्यातून प्रबोधन घडाव यासाठीच लिहितो. वडील सरकारी नोकरीत होतें. सातवी पर्यंत शिकलो पणं कलेच्या नादाने नोकरी केली नाही. आता मुल स्थिरस्थावर असली तरी त्यांना घडवताना, वाढवताना मला आर्थिक परिस्थिशी खूप झगडावं लागलं. समाजानं भरपूर मान सन्मान दिले. त्यांनी शासकिय कार्यक्रम गावोगाव सादर करून विविध शासकिय योजना उपक्रम यांची माहिती सर्वसामान्य पर्यंत पोहोचविली आहे. शासन स्तरावरून कलावंताच्या कलेला मान मिळायला हवा. फोन माध्यम मधून दादा माझ्याशी हल्लीं बोलतात. भरपूर गाणी कॅसेट ची गाणी ऐकवतात.कलावंत हा धनाने नसला तरी मनाने नी मानाने मोठा असतो याची मी अनेका कडून अनुभूती घेतली आहे. आदरणीय रमेशजी बैले दादाही याला अपवाद कसे असतील. मोठी प्रसिध्दी असून अतीशय नम्रपणे बोलण हा त्यांचा स्वभाव मला आवडला.त्यांच्या विषयी आणि मुख्यतः त्यांच्या प्रत्येक कॅसेट मधील गीतांवर वेगळ्या पद्धतीनं लिहिण्याची इच्छा आहे.
या कवींची गाणी मी ऐकलेली आहेत मिलिंददादा शिंदेनी गायलेले

**"कंठ हा माझा दाटून आला**
**अंतीम घडीला अंतीम घडीला**
**कळवा बडोद्याला माझ्या लाडक्या जीवाला, भिवाला""**

शकुंतला जाधव यांनी गायलेले

**"मी भीमाची नातं**
**भीम माझ्या हदयात**
**मोठया रुबाबात फिरते**
**भीम वाडीत**
**भिमामुळे बसले मी टोयोटा गाडीत"**

आणि १९९१साली आनंद मिलिंद या बंधूंच्या तोंडून डी महेन्द्र कुमारच्या ऑर्केस्ट्रात ऐकलेल

**"अग मी हाय आनंद**
**अन् मी हाय मिलिंद "**

लोकगीत नीट समज पूर्वक ऐकली की त्यांची गोडी लागते. अर्थ कळतो. असं माझं वैयक्तीक मत आहे.
मला एकच गोष्ट भावली की जातधर्मा पलीकडे जावून सर्वांना भावतील अशी जर तुमची लेखणी वाणी असेल तर समाजांत तुम्ही ओळखले जाता. रमेशजी बैले यांनी पैसा फार कमविला नसेल पणं त्यांची लेखणी श्रीमंत आणि अजरामर आहे. त्यांनी असच समाजाच मनोरंजन प्रबोधन करावं

## सी -व्हिजिल अ‍ॅप आता मराठीमध्ये देखील



**जगन घाणेकर,**
**घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०***




सी-व्हिजिल हे अ‍ॅप हे आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्याकरिता एक अभिनव असे मोबाइल अ‍ॅप्लिकेशन आहे की, ज्याद्वारे प्रत्येक नागरिकाला निवडणुकीच्या वेळी आपल्या स्मार्टफोनचा उपयोग करून छायाचित्रे, श्राव्य, किंवा दृक चित्रण अपलोड करता येते. 'सी-व्हिजिल'चा अर्थ 'सतर्क नागरिक' असा आहे. हे अ‍ॅप आता मराठी भाषेत पण उपलब्ध आहे.या अ‍ॅपच्या माध्यमातून तक्रार दाखल झाल्यानंतर आचारसंहिता उल्लंघन झाल्याचे ठिकाण शोधण्यासाठी जी.पी.एस.चा उपयोग करता येतो.तक्रारीच्या स्थितीचा मागोवा घेवून 100 मिनिटांत स्थितीची माहिती देते.

सी-व्हिजिल अ‍ॅप डाउनलोड करण्यासाठी लिंक.

गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id=in.nic.eci.cvigil&hl=en_IN

Add a little biअ‍ॅपल स्टोअर https://apps.apple.com/in/app/cvigil/id1455719541 वर उपलब्ध आहे.t of body text

## सक्षम अ‍ॅप

भारतीय निवडणूक आयोग दिव्यांग नागरिकांसाठी (पीडब्ल्यूडी) मतदार ओळख आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याकरिता हे अ‍ॅप विकसित केले आहे. या अ‍ॅपवर दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

निवडणूक संदर्भात सेवा घेण्याकरिता दिव्यांग व वयोवृद्ध मतदारांनी त्यांचे नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक इ. माहिती अ‍ॅपमध्ये भरावी. दिव्यांग व वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांना या सक्षम अ‍ॅपद्वारे मतदानाच्या दिवशी मतदानासाठी लागणाऱ्या सहाय्यतेची मागणी नोंदविता येईल, त्याद्वारे मतदारसंघातील दिव्यांग आणि वयोवृद्ध मतदारांना त्यांच्या मतदानाचे मतदारसंघ व स्थान निश्चिती यंत्रणेला करणे शक्य होईल. या अ‍ॅपद्वारे नोंदणी झाल्यानंतर दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहतूक व्यवस्था, व्हीलचेअर, सहाय्यक, मदतनीस इ. प्रकारची सुविधा या अ‍ॅपच्या माध्यमातून मिळणार आहेत.

सक्षम अ‍ॅपमध्ये अनेक सुविधा प्रदान करण्यात आल्या आहेत. या अ‍ॅपमध्ये मोठे फॉन्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट रंग असल्यामुळे दिव्यांगासाठी वापर करणे सोपे होईल. यामध्ये मतदान केंद्राबद्दल माहिती उपलब्ध असून ज्यामध्ये आपले मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्र, उपलब्ध प्रवेश योग्यता आणि अधिकारी संपर्क या तपशिलाचा समावेश आहे. दिव्यांगांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या कोणत्याही समस्येबद्दल अ‍ॅपवर तक्रार नोंदविता येणार आहे.

गुगल प्ले स्टोअर मध्ये https://play.google.com/store/apps/details?id=pwd.eci.com.pwdapp

अ‍ॅपल फोन धारकांसाठी https://apps.apple.com/in/app/saksham-eci/id1497864568

## आगासला ता मागासला....

## मालवणी बोली



**वयल्यांचा कवग्या,**
**मालवण- सिंधुदुर्ग.**

परवाच आमच्या गटाची मिटींग झाली. तर, सांगाचा म्हणजे आमची शेजारीन परबीन आमच्या गटाची अध्यक्ष झाली. गेल्याच आठवड्यात आमच्या कमिटीची मुदत संपली म्हणान सेक्रेटरी बाईन मिटींग लावल्यान. सगळ्यांचा एकमत झाला, रविवारी बसाया, मिटींग घेवया आणि हात वर करूनच मतदान घेवया. कमिटीवर येवसाठी परबीन किती उत्सुक बघा! माका बाय कोणी सांगल्यान असता, तू ऱ्हव उभ्या निवडणूकीक तर मी बाय ठाम नकार दिलं असतंय. सकाळी उठान पोरग्यांचे डबे, चेडवाची तयारी, घोवाचो डबो, लादी, कपडे, जेवाण, भांडी करता करता जीव येता मराक, ढोपरा येतत गळाक. आणि ह्या नसता लचांड कोण गळ्यात मारुन घेयत?

परवाच्या मिटींगीची गंमत, परबीन कमिटीत निवडान इली. माझी सख्खी शेजारीन असल्या कारणान माझा मत पण परबीनीच्याच पदरात पडला. पण आमका वाटलला, वयान ज्येष्ठ आणी अनुभवान सिद्ध अशा सावंतकाकींक चेअरमन करतीत. पण काय सांगा तुमका, कमिटीत गेली काय, दुसऱ्याच दिसापासून परबीनीन सेटींग लावल्यान. कंबार बांधल्यान नि ह्येका भेट, त्येका भेट करून सगळ्या कमिटी मेंबरांक वश करून घेतल्यान. दुसऱ्या दिसा ऐकतव तर काय, परबीन नवी चेअरमन, ती पण बिनविरोध!

चेअरमन झाल्यापासून परबीनीचो रुबाब काय बघशात, परवा मी आपला सहज गजालेक गेलय तर परबीन जेवाण करी व्हती. माका बघल्यार परबीनीचो घोव म्हणता कसो, वयनीनु, गटाचा काय काम काढलास काय? आसत आसत चेअरमनमॅडम आसत. जेवाण करतहत वाय्च. बघा आता साध्या परबीनीची आता चेअरमनबाई झाली. कालच सांचे भाटीन गजालेक म्हणान आमच्या आईंकडे इली. आमच्या आईंक ह्या असला गटा बिटाचा काय म्हायत नाय. भाटीन म्हणता कशी, आईनु, परबीन गटाची चेअरमन झाली. तुमका म्हायत आसा की नाय? आमका वाटलला, सावंतकाकी होतीत चेअरमन. पण परबीनीन बाजी



मारल्यान नाय? तशी एक मोठो आवंढो गिळीत माझी सासुबाय म्हणाली, काय काय बघूचे दिस इले बाय माझे.... आगासला ता मागासला नि पाठसून इलला गुरवार ऱ्हवला!



## पनीर ठेचा रेसिपी



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**आज आपण पनीर ठेचा पाहूया आणि चाखूया**

**साहित्य :**

- **पनीर: 200 ग्रॅम (छोट्या तुकड्यांमध्ये कापून)**
- **लसूण: 6-7 पाकळ्या**
- **हिरव्या मिरच्या: 4-5 (तिखट आवडीनुसार)**
- **कोथिंबीर: 2 टेबलस्पून (बारीक चिरलेली)**
- **मोहरी: 1 टीस्पून**
- **जीरे: 1 टीस्पून**
- **तेल: 2-3 टेबलस्पून**
- **हळद पावडर: 1/2 टीस्पून**
- **लिंबाचा रस: 1 टीस्पून**
- **मीठ: चवीनुसार**

**कृती:**

1. **मसाला तयार करा**
2. **पॅनमध्ये 2-3 टेबलस्पून तेल गरम करा.**
3. **त्यात मोहरी आणि जीरे टाका. फोडणी फुटल्यावर लसूण आणि हिरव्या मिरच्या घाला.**
4. **लसूण सोनेरीसर झाला की हळद पावडर टाका आणि एक मिनिट परता.**
5. **2. पनीर शिजवा**
6. **मसाल्यात पनीरचे तुकडे घालून चांगले मिसळा.**
7. **2-3 मिनिटे पनीरला मसाल्यात परता, पण हलक्या हाताने, जेणेकरून पनीर तुटणार नाही.**
8. **3. लिंबू आणि कोथिंबीर घाला**
9. **गॅस बंद करून मिश्रणात लिंबाचा रस आणि कोथिंबीर टाका.**
10. **चांगले एकत्र करून थोडा वेळ झाकून ठेवा, जेणेकरून सर्व मसाले पनीरमध्ये मुरतील.**
11. **सर्व्हिंग टिप्स**
12. **हा पनीर ठेचा गरमागरम भाकरी, पराठा किंवा भातासोबत सर्व्ह करा.**
13. **अधिक तिखट हवे असल्यास हिरव्या मिरच्यांची संख्या वाढवा.**




## गावाकडच्याआठवणी

( पान २ वरून )

होती .इतके सुंदर घर मी वाडीत सुद्धा पहिले नव्हते. इतके नीटनेटके होते. बसायला लाकडी बाक होते. बसताच तेलीमामा माठातील पाण्याचा तांब्या घेऊन आला. विचारपूस करू लागला.आजोबांनी तोंडातील सुपारीच्या ऐवज चुळ भरून लांब पिचकारी उडवली आणि तांब्यातील पाणी गटागटा प्यायले.
"बेस हायत" म्हणत माझ्याकडे तांब्या दिला.

मी ते घर न्याहाळण्यात मग्न होतो.घरात मोठीच माणसे वावरत होती. मोजून पाच सहा माणसे दिसत होती. वाडीवस्तीपासून गावाच्या एवढ्या लांब ही लोकं कशी राहत असतील.चहूबाजूने मोकळं माळरान. त्या माळरानावर चालू असलेल्या रहाटगाड्याचा जगाचा काहीही संबंध नाही असे वाटत होते. पायवाटेशिवाय यायला कोणताच मार्ग दिसत नव्हता. तरी सुद्धा एक छोटेखानी किराणा दुकान होते. त्या दुकानाला लागूनच तेलाचा घाना होता. घाना गरगर फिरत होता. मी त्या कडे पाहत बसलो होतो. इतक्या दूरवर कोण येत असणार? असा माझ्या मनात प्रश्न पडला होता. पण त्या दोन तासात आजोबांसारखी चार पाच माणसे येत होती, जात होती. जेव्हा आजोबांनी डोक्यावरून आणलेली तिळाची पिशवी त्या घाण्यात रिकामी केली. तेव्हा समजलं की लोकं तेल पाडायला इतक्या लांब येतात. बैलांच्या साहाय्याने तेलाची गिरणी चालत होती. ते पाहून मला नवल वाटले. येणाऱ्या प्रत्येक माणसाला चहा पाणी विचारला जायचा. त्यासाठी खास करून तेली मामा कामाला ठेवले होते हे कळाले. अधून मधून आजोबांशी तेली मामा वाडीतील लोकांची विसारपुस करीत होते.त्यांचा बोलण्यावरून ते आपल्या वाडीतील असावेत असे वाटत होते.आजोबांनी पण चहा घेतला होता आणि मला एक नळ्यांचं पाकीट घेऊन खायला दिले होते.फणसाच्या झाडाखाली बसून मी साऱ्या हालचाली टिपत होतो.मागच्या बाजूला विहीर पाहतच जवळ गेलो.पाण्यात वाकून पाहिले तर जणू काही मला मी आरशात पाहतोय असे वाटले.इतके स्वच्छ,निर्मळ पाणी त्या विहिरीत होते.गंमत म्हणून एक दोन खडे विहीरीत अलगद मारून बघितले.भोवरा फिरवा तसा तरंग उठला.पुन्हा पाणी शांत झाले.पुन्हा तरंग पुन्हा शांत.मला हा खेळ नव्याने उमजला होता.मन हरखून गेले होते.त्या दिवशी आजोबा मला वेगळ्या दुनियेत घेऊन आले होते.

तेल पाडून होताच आजोबांनी घरी निघायची तयारी केली.माझे मन मात्र तिथे रमले होते.सड्यावरच्या अनोख्या विश्वातून माघारी परतत असताना सीमेवर असणाऱ्या वाघोबाच्या मंदीरात पाया पडून निघालो.तेव्हा आजोबा म्हणाले,
"वाघोबाची कृपा म्हणून सड्या हाय. त्याची नजर माळावर हाय.तीन गावाचा तो मालक हाय."

आजोबांनी मला आणखीन कोड्यात टाकले.मी समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. तीन गावाच्या सीमेवर माळरानी खडकावर वसलेलं घर पाहून मी सुखावलो होतो. वासू आजोबांनी मला भर उन्हातून सड्यावर आणली,पण ते ऊन आता मावळतीला झुकत होते. तांबूस किरणे गवतावर पसरली होती.त्यामुळे गवताला सोन्याचा भाव आला होता.पाखरांची किलबिल सुरू झाली होती.पक्षी घरट्याकडे परतत होते.आम्हीही डाग उतरत सांज वाटेने घर गाठण्याची लगबग करीत होतो. आता आजोबा मागे आणि मी पुढे चालत होतो. एकेक बेडा पार करीत देवळाजवळ आलो. तिथं जनेआये आजोबांची वाट बघत सानेवर बसली होती.मला बघताच उठली आणि पुढे येऊन तिने आजोबांच्या हातातील पिशवी घेतली.मी माझ्या गाडीला किक मारली नी घ्यांगग्यांग करीत घरी गेलो. सगळ्यांना सड्यावरच्या रानातील घराची अनोखी गोष्ट सांगायला.ते घर मला दंतकथेतील महल वाटू लागले होते.

## मेळेकरीण

**( पान २ वरून )**

तिका असो भ्रष्टाचार चलना नाय... पण लेकरू चुकला! गावकारा, मी लेकराच्या अंगातल्या तत्वाची समजूत घालतंय... गावच्या मर्यादेची, लेकराच्या मूळ मर्यादेची, लेकराच्या घरच्या आकाराची समजूत घालतंय... लेकराचो घरचो आकार आज बंदिस्त आसा... त्येका मुक्त करतंय.... लेकराचे अपराध पायाखाली घालतंय... लेकराक सहा महिन्यांची मुदत देतंय... लेकराक गुण देतंय... लेकराक अनुभव देतंय... दिलल्या मुदतीत लेकराची रखवाली करतंय... दिलेल्या मुदतीत लेकरू पाषाणाकडे बसात.... पाषाणाकडसून मेळो करून घेय्त... चल घाल खोरणी! दुसऱ्याच क्षणी विठ्ठलादेवीची शिवकळा जोरजोरात थरथरु लागली. तिच्या खांद्यावरील खांबकाठी गरगर फिरू लागली. असे दोनदा, तीनदा घडले आणि पुढच्याच क्षणी एका हातावर खांबकाठी भोवऱ्यासारखी गरगर फिरवीत विठ्ठलालेवीने डोळ्यांचे पाते लवते, ना लवते तोच खांबकाठीच्या खालच्या टोकाच्या पोलादी खिळीने खोरणीसाठी पुढ्यात ठेवलेला नारळ एका फटक्यात फोडला आणि विठ्ठलादेवीसह साऱ्या शिवकळा विलक्षण वायुवेगाने पाणंदीतून पुढे धावत गेल्या. त्यांच्यामागून बारा-पाच मानकरी, गावकार, सारी रयत धावतच पुढे पुढे जाऊ लागली.

# काव्यांगण

## चक्र-२

मेंदूच्या आकारावर ठरत नाहीत
प्राण्यांच्या उत्क्रांतीच्या कथा.
त्यांच्या अस्तित्वावर असावे लागते
करुणेच्या यंत्राचे चक्र

चक्र गंजू नये म्हणून
करत राहायला हवी
त्याच्या परिवर्तनाची आवर्तनं
माणूसपणाने

चक्रांनी सांधत जावे
एक एक वर्तुळ
त्याच्या सगळ्या कंगोऱ्यांसह
गर्भात वाढणाऱ्या अर्भकाच्या
विकासक्रमाबरहुकूम

एकेक अवयव संवेदनशीलतेने सजीव करत
चक्रांनीच द्यावा जन्म
सेपियन्सना
माणूसपणाच्या चेहऱ्यासह
आणि खोलवर नोंदवत जावे त्याच्या जनुकांवर
यंत्राचे मुलतत्व
कारुण्याने.

बाकीची उत्क्रांती होत राहील
निश्चिंतपणे
मानवाच्या मेंदूत
आपोआप

**सुदेश मालवणकर**
**दापोली**

## चक्र

एक दिवस निघतो
पुसटशा काळोखातून
हुंदारतो कुठे तरी वणवण
परततो क्षितिजापाशी पुसटसा
सांजावल्यागत

काळोख पुसटसा अंधारण्याआधी
पुटपुटतो पुसटसं काही तरी
दिवसाच्या कानात
अंधूकल्या भाषेत

ढिम्म काळोख मग गिळून टाकतो
त्या पुसटशा दिवसासकट
अंधूकशा संध्येलाही
आणि टम्म झाल्यानंतर
अजगराने विळखा मारावा एकाद्या वृक्षाला
तसा पडून राहतो निपचीत रात्रभर

हे सगळं भयावह दृष्य सुरू राहतं अंधूकअंधूकसं

नेहमी प्रमाणे विक्रमादित्य सांगत बसतो
न संपणाऱ्या गोष्टी
मृतवत दिवसाला खांद्यावर घेऊन
अर्धमेल्या रात्रीच्या देहातील वेताळाला

सुदेश मालवणकर
दापोली

## समा

तुझ्या मदमस्त देहाला
जरा बहरून घेऊ दे
मनाच्या आत धुंदीचे
नशीले माज बहरू दे

जणू पडदाच लाजाळू
सरींचा ही धरा ल्याली
शहारा मत्त ज्वानीचा
नभाला आजमावू दे

चमकली दामिनी गगनी
उराशी बिलगली धारा
ढगा तू बरस रे ऐसा
गुलाबी रात होऊ दे

उसासे लाल विरघळले
कपोली लाज थरथरली
सुगंधी कुंतलांनाही
जरासा श्वास घेऊ दे

नभाची कोण नवलाई
धरेसी शाल हिरवाई
तनाला धूंद रागांच्या
समेवर स्वार होऊ दे

**सुदेश मालवणकर**
**दापोली**

## जबाबदारी..!

जीवन हीच आहे
एक जबाबदारी,
इथं क्षणाक्षणाला
ती संभाळावी लागते..!

जबाबदारी असो कुठलीही
तिला पूर्ण क्षमतेने,
प्रतिसाद देण्यास आपण
समर्थ असावे लागते...!

जबाबदारी वय
पाहून येत नाही,
पण खांदे मात्र
मजबूत करून जाते...!

देश तेव्हाच मोठा होतो
जेव्हा प्रत्येक नागरिकाला,
देशासाठी त्यागण्याची
जबाबदारी समजते...!

**प्रा. के. एस. शिरबंदे,**
**दापोली.**

# खरंच..... स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही!

सुखदा सयाजीराव गोरड, दापोली

"बाई काय हे ऊन,
नक्कोस झालय अगदी."वैतागलेल्या सुरात सुमन पुटपुटत होती आणि निघाली होती..... स्वतः ला काय होतंय ते दवाखान्यात बघायला .तिथे डॉक्टरांनी तिचे म्हणणे ऐकून घेतले, तपासले नि भली मोठ्ठी यादी दिली पंधरा एक तपासण्यांची.आधीच ती भित्री......नि भीत्या पाठी ब्रह्मराक्षस!मग काय पटापट सर्व टेस्ट करुन तब्बल तीन तासांनी ती आली व डॉक्टरांना परत भेटली.दोन दिवसांत सर्व टेस्टचे रिपोर्ट मिळाले की या असे डॉक्टरांनी सांगितले.दोन दिवस अगदी तर्क कुतर्कांमध्येच कसे गेले तिला कळलेच नाही. मात्र तिचे मन कशातच लागत नव्हते, भीतीने तिची अगदी गाळणच उडाली होती. रिपोर्ट बघून डॉक्टरांनी बायोप्सी नि मॅमोग्राफी करायला सांगितले, दिलासा दिला,"घाबरु नका सर्व काही ठीक होईल.आता आठवडाभरात तुम्हाला कॅन्सर आहे की नाही ते कळेल आणि असलाच तर आपण छान उपचार सुरू करु.ओके!" घरी आल्यावर परत तीच अवस्था.आठवडाभर नुसती जीवाची तगमग आणि तळमळ. चित्त नाही थाऱ्यावर...सारखी टांगती तलवार!

रिपोर्ट मिळाले हे कळल्यावर तिने पटकन धाव घेतली दवाखान्याकडे.कधी एकदाचे डॉ.बोलावतायत नि मी पॉझिटिव्ह नाही असे सांगताहेत असे तिला झाले होते.ती आतुरतेने वाट बघत होती तिचा नंबर येण्याची. नर्सने हाक मारल्यावर ती तंद्रीतून बाहेर आली आणि आत गेली. डॉक्टर बसा म्हणाले,"तुमच्या बरोबर कोणी आले नाही का?तुमचे रिपोर्ट पॉझिटिव्ह आहेत, तुम्ही सेकंड स्टेजला आहात.उपचारामध्ये सातत्य ठेवले तर तुम्ही लवकरात लवकर बऱ्या व्हाल".हे सर्व कानात जीव एकवटून ऐकणाऱ्या सुमनला खूप अवघड,दु:खदायी वाटत होते आणि अश्रूंचा बांध फूटून ते डोळ्यांतून वाहत होते,पाया खालची जमिन सरकल्याने ती अगदीच हवालदील झाली होती आणि..... विमनस्क मनस्थितीत ते सर्व ऐकताना तिला डोळ्यासमोर तिची गोड निष्पाप मुलगी दिसत होती.काय करावे, कुठे पळावे, उपचारासाठी पैशांची तजवीज कशी करावी, कुणाला सोबत आणावे,असे असंख्य प्रश्न आवासून तिच्या समोर उभे होते.ती बघत होती अगदीच हतबल होऊन.पण.....लगेचच तिने डोळे पुसले, डॉक्टरांचे आभार मानले नि कर्ज काढण्यासाठी ती बँकेत गेली, कागदपत्रे, सह्या सारेकाही दोन दिवसांत आटोपले. सर्जरीचा दिवस ठरला,आई वडील,पती हे सर्व वारलेले असल्यामुळे, कागदपत्रांवर कोण सही करणार इथपासून प्रश्न निर्माण झाला.दवाखान्यात मैत्रिण आली बहिण म्हणून सही करायला.तिच सतरा वर्षांच लेकरु कावरीबावरी होऊन...ती आईकडे बघत होती,रडत होती, स्वतः चे अश्रू आईपासून लपवत होती.आईला आय सी यु मध्ये नेले, तीन तासांनी आईला बघायला या,आता बाहेर थांबा..असे सांगण्यात आले.तिला भूल दिली होती,ती निपचित पडली होती...पण तीन तास उलटून गेले तरीही माझी आई अजून कशी बाहेर आली नाही म्हणून तिच्या लेकिने आकाश पाताळ एक केले होते.ती येरझाऱ्या घालतं येणाऱ्या जाणाऱ्या नर्स व डॉक्टरांना विचारत होती आई कधी बाहेर येणार.तेव्हा नर्स म्हणाली,"डोन्ट वरी, अजून दोन तास लागतील,लगेचच पॅनिक होऊ नका.बसा बाहेर,बोलवते नंतर." मुलगी जास्तच गोंधळली,धायमोकलून रडू लागली, डोळे सुजले,लाल झाले, अश्रू पुसून, नाकं पुसून सर्वच लालेलाल झाले!आईला ओटी मधून बाहेर आणल्यावर लेकीची कळी खुलली!

आईला शुद्ध येईतो लेक तिच्याकडे बघत होती, डोक्यावरून हात फिरवत होती,तिचा हात घट्ट धरत होती मनातून गणपती बाप्पाला आळवत होती.... आणि आई शुद्धीवर आली आहे हे पाहून सुखावली होती. नर्सने दिलेल्या परचीची औषधे घेऊन आली होती... अगदी वायू वेगाने!

आई भानावर आली होती, तिला ओकावेसे वाटत होते, म्हणून ओमेटींग साठी पॉट घेऊन साश्रू ती आईला मदत करत होती,तिची पाठ चोळत होती, डोकं दाबत होती.एवढेसे लेकरु आता आईची आई झाले होते.!....तर मग काय,आईची आता वाघीणच झाली होती.लेक जिवापाड काळजी घेत होती, पुढे केमो, रेडिएशन यांमुळे महत्त्वाचे इयत्ता बारावी चे वर्ष वाया गेले होते..... तरीही मुलगी डोळ्यात तेल घालून, आईची सेवा करत होती, काळजाच्या तुकड्यांप्रमाणे आईला जपण्यासाठी तिने जीवाचे रान केले होते.तिचा त्याग व अथक परिश्रम यांच्या बळावर आईने या जर्जर करणाऱ्या जीवघेण्या रोगावर मात केलेली होती.घरी भेटायला आलेल्यांना, येणाऱ्यांना सुमन अभिमानाने सांगत होती, लेकीची थोरवी!दोघींनी भोगलेल्या नरक यातना आठवून ती आपसूकच म्हणायची,"खरंच मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही!"

# बाल जगत



## नको नको ही थंडी

**आली आली थंडी**
**चला शेकोटी पेटवायला**

थंडी म्हणजे हिवाळा ऋतु. या वेळी खुप थंडी लागते. सकाळच गरम चहा दुध पियाला खूप मज्जा येते. थंडीत सकाळच उठूसच नाही वाटत. बॅन्केट घेऊन गप चुप झोपाव वाटो. सकाळच्या कोवळ्या उन्हात सगळे बसलेले असतात. उनात गेलो की थंडी गायब होते आणि घरी आलो की थंडी लागते होती. रात्रीच शेकोटीच्या गोळ बसून गप्पा मारायच्या.शेकोटिवर हात शेखवायचे त्यांनी थोडी थंडी कमी लागते . उब येण्यासाठी गरम स्वेटर घालायच किंवा बॅन्केट घेयाच. कधी कधी खूपच थंडी लागते मग अस वाटते नको ती थंडी. कधी जातेय ती थंडी अस वाटते.



कु**. इशांत राजेंद्र पागडे,**
**इयत्ता- आठवी.**



पावसाळा संपला की लगेच येणारा त्रतू म्हणजे हिवाळा आणि हिवाळा त्रतूआल्यावर सर्व जण शेकोटी पेटवतात. आणि शेक घेतात. पूर्वीची लहान मुलांन पासून मोठ्या माणसान पर्यंत माणसे शेकोटी पेटवायची पण आता तो काळ गेला आहे. आणि आता सर्व लोकांकडे, लहान मुलांकडे पण मोबाईल आहे. म्हणून आता कोण जास्त माणसं शेकोटी पेटवत नाही.मला अस वाटत की मोबाईल नको पाहिजे. हिवाळा ऋतू मध्ये सर्वलोक गरम अंगाचे कपडे घालतात. पूर्वी गरम अंगाचे कपडे पण नव्हते. पण आता काही मुलांना कपडे भेटतात पण ते घालत नाही. हा एकच असा त्रतू आहे की ह्या त्रतू मध्ये सर्वजण गरम अंगाचे कपडे घालतात. मला जास्त करून पावसाळा ऋतू आवडतो. ह्या त्रतू मध्ये कोणीही माणस घरातून बाहेर पडण्यापूर्वी ते गरम अंगाचे कपडे घालून बाहेर जातात. मी पण बाहेर पडण्यापूर्वी गरम अंगाचे कपडे घालून बाहेर जातो. आणि ह्या त्रतूत हिवाळी स्पर्धा होतात. आमच्या स्पर्धा पण चालू आहेत. मी आता तालुक्याला खेळणार आहे. जर आपण थंडी मधून सकाळी समुद्रा वर गेलो तर आपल्याला गरम वाफ लागेल. जर आपण पडलो तर आपल्याला दुखापत झाली तर ती लवकर बरी होत नाही. आपल्याला थंडी मधून सकाळी लवकर उठायला होत नाही. "आला थंडीचा महिना शेकोटी पेटवा" असे गाणे ही म्हंटले जाते. हिवाळा त्रतू मध्ये आंबा, काजू मोहरतात. मला हिवाळा महिना खूप खूप आवडतो.



**कु. विराज राजेंद्र मुलुख,**
**इयत्ता- सातवी**

## नको नको ही थंडी!



जेव्हा उन्हाळा संपतो तेव्हा हिवाळा सुरू होतो. हिवाळ्यात खूप थंडी लागते. आजही आम्हाला खूप थंडी लागते. आम्ही तर रात्री घरातच असतो घरातून बाहेर पडलो की खूप थंडी लागते. या थंडीमुळे काही लोकांना ताप ,सर्दी यासारखे आजार होतात. आम्हाला तर या थंडीचा खूपच कंटाळा येतो. गेल्या वर्षी तर खूप कमी थंडी होती पण या वर्षी खूप जास्त थंडी आहे. मी जेव्हा सकाळी शाळेत जातो तेव्हा तर खूप थंडी आणि हुडहुडी भरते.या थंडीमुळे लोकांना सर्दी ताप यासारखे आजार सहन करावे लागतात. या थंडीतुन आम्हाला सकाळी लवकर उठून अंघोळ करविशी पण वाटत नाही. सकाळी उठायला पण खूप कंटाळा येतो.जेव्हा आमच्या हिवाळी क्रिडा स्पर्धा सुरू होतात तेव्हा आम्हाला खेळायला जाताना खूप थंडी ला[illegible] मला या थंडीचा खूप कंटाळा येतो.आम्ही त[illegible]णतो की नको नको हि थंडी. या थंडीत तर [illegible] लोक स्वेटर घालूनच घरातून बाहेर पडतात. धन्यवाद.



**कु. प्रसाद शिगवण,**
**इयत्ता- सातवी**

## मार्ग शोधा



www.bigstock.com · 308697893

## फरक ओळखा

